महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा

शासकीय रुग्णालयाचे मागे, वर्धा ४४२ ००१,

E-mail – dietwardha@gmail.comदुरध्वनी क्रमांक ०७१५२-२४५५९१

जा.क्र.जिशिप्रसं/शोधनिबंध/स्पर्धा/वर्धा/ /२०२५

दिनांक –२९/१०/२०२५

प्रति,

मा.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/ योजना) जि.प. वर्धा
गट शिक्षणाधिकारी, पं.स. (सर्व), जिल्हा वर्धा
प्रशासन अधिकारी, न.प. (सर्व), जिल्हा वर्धा .

विषय:-शिक्षक व अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत...

संदर्भ:- १. राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२०
२. राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४
३. शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२४/प्र.क्र. १०/एसडी-६ मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च, २०२४
४. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.राशैसप्रप/शिक्षक स्पर्धा/२०२५-२६, दिनांक १०/१०/२०२५
५. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या ऑनलाईन बैठकीमधील सूचना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकिय स्थानिक स्वराज्य संस्था,व खाजगी अनुदानित ( प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक ) शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी,कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक ,प्रशासकिय कौशल्ये वृधींगत करणे,त्यांच्यात समन्वय,सहकार्य व स्पर्धात्मकेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डीजीटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उददेशाने तालूका,जिल्हा व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेचे आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा या एकूण ४२ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी / कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे या संस्थेच्या **www.maa.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन २०२५-२६ वर्षापासून एकुण ४२ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्हयामध्ये **DIET** कडून आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित **DIET** कडून मार्गदर्शक सुचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

वरील ४२ स्पर्धेपैकी शोधनिबंध स्पर्धेच्या राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,वर्धा यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

Scanned with OKEN Scanner

## शोधनिबंध स्पर्धेविषयी:-

संदर्भ क्रमांक ५ च्या पत्रानुसार नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रत्येक तालुक्याने तालुका स्तरावर स्पर्धा आयोजित करावयाची आहे.

त्यासाठी खालील सूचना देण्यात येत आहे.

१.शोधनिबंध स्पर्धा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच अधिकारी व कर्मचारी या सर्वांसाठी एकाच गटात घेण्यात यावी.
२.जिल्हयातील शैक्षणिक क्षेत्रातील समस्या पटनोंदणी,उपस्थिती,शैक्षणिक गुणवत्ता,अध्ययन अनुभव देण्याची पध्दती (अध्ययन पध्दती) मूल्यमापन विषयावर आधारित शोधनिबंधाचा विषय असावा.
३.स्पर्धा तीन स्तरावर होईल.( तालुका,विभाग व राज्य)
४.स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा/राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.
५.केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.
६.स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहीत करावे.
७.सहभागी होणा-या कर्मचा-यांची /शिक्षकांची लेखी संमंती घ्यावी. स्पर्धेच्या वेळी आयोजकाकडे सादर करावी.
८.प्रत्येक तालुक्यातील प्रथम क्रमांक पात्र स्पर्धक विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरतील.
९.प्रत्येक विभागस्तर स्पर्धेमधुन प्रात्र उत्कृष्ठ शोधनिबंध निवडावा. व ते शोधनिबंध राज्यस्तरावर स्पर्धेत सहभागी होणेसाठी पात्र ठरेल.
१०.शोधनिबंधाचे लेखन २००० ते ३००० शब्दमर्यादेत असावे.
११.शोधनिबंधाच्या लेखनाचा फॉन्ट यूनिकोड असावा.फॉन्ट आकार १४ असावा.
१२.शोधनिबंधाचे लेखन करुन स्पर्धकाला ५ ते ६ मिनीटे सादरीकरण करावे लागेल.
१३.प्रत्येक स्तरावर शोधनिबंधाचे लेखन तपासणी व सादरीकरणाचे मूल्यांकन करण्यासाठी परीक्षक नेमण्यात येतील.
१४.तालुकस्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतीम करुन **DIET** कडे बायोडाटासह दिनांक ३१/१०/२०२५ पर्यंत पाठवावीत. तसेच स्पर्धेचे ठिकाण कळवावे.

प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकांची निवड करावी परिक्षकांसाठी **S.C.E.R.T.**पूणे यांचेकडुन निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारीत मानधन वितरीत करण्यात येईल.

## तालुकास्तरीय आयोजन समिती :-

| अ.क्र. | सदस्याचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | गट शिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २ | तालुका संपर्क अधिकारी (DIET) | सदस्य |
| ३ | केंद्रप्रमुख प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | विषय साधन व्यक्ति प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | तालुका विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

## शोध निबंध स्पर्धेचा गुणदान तक्ता:-

| अ.क्र | निरीक्षणाचा मुद्दा | गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | शोधनिबंधाच्या विषयाची निवड | १० | |
| २ | शोधनिबंधाची मांडणी | १० | |
| ३ | शोधनिबंधाची उद्दीष्टे व त्यानुसार केलेली कार्यवाही | १० | |
| ४ | शोधनिबंधाची उपयुक्तता | १० | |
| ५ | सादरीकरण कौशल्य | १० | |
| | एकूण गुण------------ | ५० | |

Scanned with OKEN Scanner

शोधनिबंध स्पर्धेचे संभाव्य नियोजन:-

| अ.क्र. | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर तालुकास्तर | डिसेंबर विभागस्तर | जानेवारी राज्यस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | चौथा शुक्रवार | शोधनिबंध स्पर्धा | वर्धा | नोव्हेंबर अखेरपर्यंत | डिसेंबर अखेरपर्यंत | जानेवारी अखेरपर्यंत |
| | | | | कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धतील १ विजेता निवडणे | कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धतील ५ विजेता निवडणे | कॉलम २ मधील दिवसापर्यंत पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धतील १० विजेता निवडणे |

तालुकास्तरीय आयोजनाबाबत:-

१. तालुकास्तरावरील सर्व स्पर्धांचे आयोजनाची जबाबदारी गट शिक्षणाधिकारी यांची राहील.
२. स्थळ निश्चिती करून, सक्षम परीक्षकाची निवड करून विहित कालावधीत स्पर्धा पार पाडाव्यात व प्रत्येक स्पर्धेतील एका विजेत्यांच्या नावांची यादी तयार करून DIET कडे पाठवावी किंवा दिलेल्या लिकवर भरावो.
३. तालुकास्तरीय आयोजन समितीने संपूर्ण सनियंत्रण करावे. आयोजनात सहभागी सर्वांनी मार्गदर्शक पुस्तिका व त्यातील नियमावलीचे काळजीपूर्वक वाचन करावे.
४. परीक्षकांची नावे अंतिम करून, स्पर्धाचे स्थळ निश्चित करून परीक्षकांच्या बायोडाटासह ही माहिती दि. ३१/१०/२०२५ पर्यंत DIET कार्यालयास पाठवावी.
५. तालुकास्तरावरील सर्व स्पर्धा संदर्भिय पत्रातील वेळापत्रकानुसार नियोजित कालावधीत टप्प्याटप्प्याने पार पाडाव्यात.

वरील नियोजनामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास वरिष्ठ कार्यालय व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण (DIET) यांचेमार्फत कळविण्यात येईल.

संलग्न पत्र:-

१. SCERT चे संदर्भिय पत्र
२. मार्गदर्शक पुस्तिका व नियमावली
३. शोधनिबंध स्पर्धेची नियमावली

Signed by Mangesh Bhagwan Ghogare
Date: 29-10-2025 15:00:47

(डॉ.मंगेश घोगरे)
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
वर्धा

प्रतिलीपी:-

१.मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
२.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वर्धा यांना माहितीस्तव सविनय सादर
३. मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned with OKEN Scanner